# वंद्य वंदे मातरम आणि स्वातंत्र्यलढ्यातील घटनांची सूची

संकलक
चंद्रकांत शहासने
(देशभक्तकोशकार)
मो.क्र. - ९८८१३७३५८५

कर्नाळा चॅरिटेबल ट्रस्ट पुणेच्या सौजन्याने

ही पुस्तिका कर्नाळा चॅरिटेबल ट्रस्ट पुणेच्या राष्ट्रभक्ती पर्यावरण आणि आरोग्य साक्षरता अभियानअंतर्गत प्रकाशित केली.

पुस्तकाचे नाव : वंद्य वंदे मातरम आणि
स्वातंत्र्यलढ्यातील घटनांची सूची

संकलक : चंद्रकांत शहासने (देशभक्तकोशकार) पुणे
मो.क्र. – ९८८१३ ७३५८५

प्रकाशक : बहुजन साहित्यधारा, पुणे
११ ए, राहुल कॉम्प्लेक्स,
चौथा मजला, पौड रोड, पुणे.
दुरध्वनी : ९८८१३७३५८५
हक्क प्रकाशकाचे स्वाधीन.

प्रकाशन दिनांक : २५ डिसेंबर २०२२ पहिली आवृत्ती

मुद्रक : श्री वेंकटेश पब्लिकेशन, पुणे
हिंगणे खुर्द, सिंहगड रोड. मो. क्र. ८२३७८ ९३३४७

पुस्तकाचे हक्क : ॲड. नंदिनी शहासने

ही पुस्तिका कर्नाळा चॅरिटेबल ट्रस्ट पुणेच्या राष्ट्रभक्ती पर्यावरण आणि आरोग्य साक्षरता अभियानअंतर्गत प्रकाशित केली.

मूल्य : रूपये ४०/–

संपर्क : श्री. हेमंत प्रभाकर आळवे, ठाणे
मो. : ९३२२२६९७२१
श्री. अशोक जनार्दन फडणीस, मेणोली–वाई
९८५०५ ०९४१६
श्री. भानुदास सोपान पायगुडे, धनकवडी–पुणे
९८५०३५१०३५

Or Pay to VPA

कर्नाळा चॅरिटेबल ट्रस्ट पुणे या संस्थेस दिलेल्या देणग्या आयकर माफिस प्राप्त आहेत.

No.: THN/C.I.T.II/Tech/80G/104/2010-11/1479 Dt: 21/09/2010

# वंद्य वन्दे मातरम्



**विद्यार्थी मित्रांनो... भारतीय स्वातंत्र्याचा महामंत्र असलेल्या 'वन्दे मातरम्' ने हा देश परदास्यशृंखलांतून मुक्त करण्याकामी जी आंदोलने उभी केली या संदर्भाने सौ. अरुंधती धुमाळे यांचा लेखांक आपणांस बरेच काही सांगून जाईल.**

इसवीसन १७७०, मुसलमानी सत्ता या भरतभूमीवर अखेरचे श्वास मोजत होती. चारी दिशांनी येणाऱ्या देशभक्तांच्या हादऱ्यांनी पातशाही मरणोन्मुख अवस्थेत होती. नव्याने इंग्रजी आपली पोलादी पकड घट्ट करायला सुरुवात केली होती. पण बंगालमधील दाट जंगलात मठ बांधून राहणारे सर्वसंगपरित्यागी संन्यासी मात्र इंग्रजी सत्ता उलथवून लावण्यासाठी योजना बनवत होते. अशाच एका आनंदमठातील भवानंद हा संतान आणि त्याचे साथी एका मुस्लीम सुभेदाराशी झुंजत आहेत. पारतंत्र्याची झळ लागलेल्या कुटुंबातील कल्याणी आपल्या पतीशी फाटाफूट झाल्यामुळे याच मठाचा आश्रय घेऊन आहे. तिच्या पतीलाच सुभेदाराच्या तावडीतून सोडवण्याचा आदेश वृद्ध मठपतीकडून भवानंदाला मिळाला आहे. तो स्वातंत्र्य योजनेस लागणारी संपत्ती लुटून, महेंद्राला सोडवून स्वतः सह नेऊ लागतो. महेंद्राला हे काहीच माहित नाही. तो भवानंदाला दरोडेखोर समजून नशीबाला दोष देत त्याच्या मागून जंगलात शिरतो आणि उत्स्फुर्तपणे भवानंद गाऊ लागतो–

***''वन्दे मातरम्।***
***सुजलां सुफलां मलयजशीतलाम् ।***
***सस्य शामलाम् मातरम्।।''***

महेंद्र चकित होऊन विचारतो, ''ही माता कोण ? हा तर देश! आपला

भारत! भवानंद उद्गारतो, 'आम्ही लोक दुसरी माता जाणत नाही. जननी जन्मभूमीश्च स्वर्गादपि गरियसि। मलयावरचा चंदनी वारा जिला सुगंधित करतो, भरघोस पिकांमुळे जी श्यामल भासते, कोटी कोटी कंठांतून आणि कोटी कोटी भुजांमधील शस्त्रांच्या खणखणाटातून जिच्या सामर्थ्याचा जयजयकार होतो, मंदीरामंदीरांतून आम्हाला जिची प्रतिमा दिसते, जी भक्ति-शक्तिचे केंद्र आहे, अशी ज्ञानमयी भरतभूमी आमची माता आहे. तिचाच मी जयजयकार करतो आहे....

***कोटि-कोटि-कण्ठ-कल-कल-निनाद-कराले,***
***कोटि-कोटी-भुजैर्धृत-खरकरवाले,***
***अबला केन मा एत वले।***
***बहुबलधारिणीं नमामि तारिणी***
***रिपुदलवारिणीं मातरम् ।।***

हा प्रसंग बंकीमचंद्र चटरजींच्या आनंदमठ मधला आणि त्यातील भवानंदच्या मुखी आहे, त्यांची ओजस्वी काव्यरचना, 'वंदे मातरम्' मलयावरून येणारा चंदनी वारा जिला सुगंधित करतो, भरघोस पिकांमुळे जी श्यामल भासते, अशी सौंदर्यशालिनी, सुजलाम् सुफलाम् भरतभूमी माझी माता आहे. हे सबले, धर्मस्वरुपिणी दुर्गा, कोटी कोटी कंठांतून कोटी कोटी भुजांमधील शस्त्रांच्या खणखणाटातून जिच्या सामर्थ्याचा जयजयकार होतो, अशी ज्ञानमयी तु माझी माता आहेस, भक्ति-शक्तिचे उदयस्थान असलेली, मंदिरामंदिरांमधून आम्हाला दर्शन देतेस अशा सदापूजनीय माते, तुला माझे प्रणाम. वन्दे मातरम्, वन्दे मातरम्!

बंगालने उच्चारलेला पण सगळ्या देशाच्या स्वातंत्र्ययुद्धाचा प्रेरणामंत्र शेकडो वीरांच्या पवित्र वाणीतले स्वाभिमानी उच्चारण, ब्रिटीशांच्या उरात धडकी भरवणारी एक मातृसामर्थ्यवंदना! एका शरणभावाची, विलीनतत्वाची आणि कृतज्ञतेच्या भावनेचे प्रकटन करणारी भारताने जगाला दिलेली एक उदात्त, भव्य शिकवणच 'वन्दे मातरम' हे शब्द आहेत.

मातृवंदना भारताला नवीन नाही. वेदकालापासून या भूमीला माता मानून तिच्यावर प्रेम करायला आमच्या संस्कृतीने आम्हाला आहेत परंपरेत हा श्लोक भूमीला वंदन करण्यासाठी म्हटला जातो,

''समुद्रवसने देवी पर्वतस्तनमण्डले
विष्णुपत्नी नमस्तुभ्यं पादस्पर्श क्षमस्वमे।''

अलिकडच्या काळात एकनाथांसारख्या देवमार्शं संतांच्या काव्य रचनेत ही हाच भाव दिसतो. अंदाधुंद होऊन दिशाहीन भटकणाऱ्या समाजाला देशाला दिशा दाखव, म्हणून आईला साकडं घालणारे संत एकनाथ महाराज व्याकुळतेने म्हणतात,

***''बये दार उघड बये दार उघड!***
***दार उघड, बये दार उघड!***
***दैत्यकुळी हिरण्यकश्यपु जन्मला***
***ते तुझा भक्त गांजला ते न पहावे तुजला त्वां ।।***
***उग्र रुप धरिले ।***
***त्यां क्रोधे स्तंभ फोडूनी।***
***नारसिंहरूप धारण करुनी।***
***दैत्यासि वधूनी। प्रल्हाद दिवटा रक्षिला***
***रणवाद्य भम् भम्, दणदण कडकड वाजती***
***तोचि गोंधळ अंबे तुजप्रति***
***रणस्वाद पट स्थापिला मद्यवर्ती।।***
***दार उघड बये दार उघड।''***

हाच भाव, हीच आळवणी, हेच मातृभूमी प्रेम 'वंदे मातरम्' मध्ये दिसते. बंकीमचंद्रांनाही हीच दिव्य अनुभूती 'वंदे मातरम्' लिहिताना आली असावी. इ.स. ८ एप्रिल १८९४ ला बंकीमचंद्र एक संदेश देऊन जगाचा निरोप घेऊन गेले, तो म्हणजे, **''हिंदू बांधवांनो, श्वानवृत्तीची आंदोलने सोडून सिंहवृत्तीचे आचरण**

**करा.''**

१९०५ उजाडले आणि बंगालच्या फाळणीची घोषणा करून लॉर्ड कर्झनने दुहीच्या विषाची पेरली. त्याच्या उन्मत्त भाषणात फूल्लर हा अधिकारी म्हणे, हिंदू आणि मुस्लिम या माझ्या दोन बायकांपैकी दुसरी माझी आवडती बायको आहे.

मातृभूमीला 'आई' मानणारी भारतीय संस्कृती आणि देशाला, समाजाला बायकोची उपमा देणारी उथळ इंग्लिश संस्कृती यांच्यध्ये असा फरक आहे.

७ ऑगस्ट १९०५ फाळणीला कडाडून विरोध करणारी कॉलेज चौकातील कलकत्ता येथील सभा चार ठिकाणी घ्यावी लागली, याच उत्साहात कुणीतरी उच्चरवात घोषणा दिली, 'वंदे मातरम्!'आणि हजारोच्या मुखातून प्रतिसाद आला, 'वंदे मातरम्!'

१४ एप्रिल १९०६ ला बरोसानला भरलेल्या काँग्रेस युवक अधिवेशनात 'फुल्लर' या अधिकाऱ्याने 'वंदे मातरम्'च्या उच्चाराला बंदी केली. बंदी हुकूमच काढला, म्हणून 'वंदे मातरम्' चे बिल्ले छातीवर लावण्यात आले. तर पोलीसांनी तुफानी लाठीहल्ला केला. रक्तबंबाळ होणारी शरीरे मात्र प्रत्येक लाठीबरोबर 'वंदे मातरम्' चा उद्घोष करू लागली. तिथून घरी परत जाणाऱ्यांचे प्रत्येक रेल्वे स्टेशनवर वंदे मातरम्ने स्वागत केले गेले. रेल्वेत सुरेंद्रनाथांशी बोलताना भगिनी निवेदिता समाधानाने हसल्या अन् म्हणाल्या, 'आपणच लावलेल्या जाळयात सरकार स्वतःच फसले आहे, नैतिक विजय आपलाच झाला आहे, असेच दृष्य सांगते आहे.'

निःशस्त्र जमावार लाठीहल्ला करून इंग्रजांनी आपला अत्याचारी हट्ट पुरवला. अन् मग अशी मालिकाच सरू झाली. त्याने संतापलेल्या सिंहहृदयांमधून 'वंदे मातरम्' उमटू लागलं. १९०६ मध्ये भगिनी निवेदितांनी त्यावर्षीच्या अधिवेशनासाठी वज्राची आकृती आणि 'वंदे मातरम्' भरलेला ध्वज तयार केला. असाच 'वंदे

मातरम्' लिहिलेला ध्वज मादाम कामा यांनी देशाबाहेर फडकवला. लोकमान्य टिळकांच्या जहाल पत्रकारितेचा वारसा बंगालात चालविणारे श्री. अरविंद घोष 'वंदे मातरम्' या इंग्रजी पत्रामधून तरूणांना क्रांतीच्या प्रेरणा देत होते. त्यात त्यांच्यावर खटलाही भरण्यात आला. त्याचवेळी मादाम कामा आणि 'गदर'चे लाला हरदयाळ यांनी युरोपात आणि स्वित्झर्लंडमध्ये 'वंदे मातरम्' याच नावाची इंग्रजी पत्रे सुरू केली होती. तर लजपतराय हिंदीतून 'दिल्लीला' 'वंदे मातरम्' नेच साद घालत होते. बऱ्यांच भाषांमध्ये याच नावाची वर्तमानपत्रे सुरू झाली. स्वा. सावरकरांनी त्याच काळात 'वंदे मातरम्' नावाचा ओजस्वी लेख लिहिला. उच्च शिक्षणासाठी इंग्लंडमध्ये पोहचल्यावर तेथील भारतीय तरुणांना एकत्र करून १८५७ ची ५० वी स्मृती जागवत 'OH, MARTYRS' नावाची पत्रके काढली. या पत्रकांचा शेवट होता, हुतात्म्यांनो, तुमच्या रक्ताचा बदला घेतला जाईल, वंदे मातरम्! 'वंदे मातरम्' मध्ये बंकीमचंद्रांनी जी जी आईची रूपे पहिली, तशीच सावरकरांनीही 'जयोस्तुते'मध्ये पाहिली. तोच शरणभाव, तीच उत्कटता त्यात दिसते.

***जयोस्तुते, जयोस्तुते श्रीमहन्मंगले, शिवास्पदे शुभदे, स्वतंत्रते भगवती त्वामहं यशोयुतां वंदे..........***

'वंदे मातरम्' च्या बदल्यात लाठ्या मिळणार अशा बंगाल मधील एका प्रसंगी एका गो-या लाठीवाल्याला प्रत्युत्तर म्हणून एका १५ वर्षाच्या किशोराने त्याला ठोसा लगावला. नेहमी लाठ्या सहन करणाऱ्या तरुणांच्या अहिंसावादावरच जेव्हा तडाखा बसला, तेव्हाची ही एक स्वाभाविक प्रतिक्रिया होती. त्या १५ वर्षाच्या कोवळ्या तरुणाला १५ फटक्यांची शिक्षा दिली गेली. उघड्या पाठीवर पडणाऱ्या प्रत्येक फटक्याच्या व्रणासह 'वंदे मातरम्' उमटू लागलं. त्या गोऱ्यांचे हात थकले, पण रक्तबंबाळ झालेलं ते पोर बेशुध्दावस्थेतही कुठल्या अज्ञात प्रेरणेनं 'वंदे मातरम्' म्हणत होते, त्या मुलाचं असामान्य धैर्य पाहून कलकत्ता शहर चकीत झालं. या तेजस्वी मुलाचं नांव होतं, सुशीलचंद्र सेन आणि त्या तेजस्विततेचा स्त्रोत होतं 'वंदे मातरम्' प्रत्येक जण हेच म्हणत होता,

*हम गरीबोके गले का,*
*हार वंदे मातरम् ।*
*छीन सकती है नही,*
*सरकार वंदे मातरम ।।*
*डाक्तरोंने नब्ज देखी,*
*सर हिलाकर कह दिया १.*
*हो गया इसको तो,*
*अब आजार वंदे मातरम् ।।*
*ईद, होली और दशहरा*
*शुबरातसेभी सौगुनो।*
*है हमारा लाडला,*
*त्योहार वंदे मातरम् ।*
*जालिमका जुल्मभी*
*काफूर सा डड जायेगा ।*
*फैसला होगा सर*
*दरबार वंदे मातरम् ।।*

१९०८ मध्ये नागरपूरच्या नीलसिटी प्रशालेत आलेले परिपत्रक विद्यार्थ्यांनी सभा-मिरवणूकांमध्ये भाग घेवू नये असा आग्रह धरणारे होते. स्वातंत्र्यलढ्यात उड्या घेणा-या विद्यार्थ्यांना रोखण्याचा प्रयत्न करणारे हे परिपत्रक पाहून त्या शाळेत शिकणारी केशवराव हेडगेवारांसारखी विद्यार्थी मंडळी रागावली. या फालतू बंधनाने ती थांबणार नव्हती. शाळेत पर्यवेक्षक म्हणून येणारे गृहस्थ आणि शाळेचे मुख्याध्यापक वर्गामधून फिरणार होते. त्यांच्या आगमनाआधी मुलांनी त्यांच्या अपूर्व स्वागताची तयारी केली. ते पर्यवेक्षक आणि मुख्याध्यापक पहिल्या वर्गात शिरताच वंदे मातरम्! अशा प्रचंड घोषाने त्यांच स्वागत केले गेल. पर्यवेक्षक संतापले. तिथून बाहेर पडून दुस-या वर्गात शिरताच तोच प्रकार! तिसऱ्या काय

सगळया वर्गांनी त्यांचे स्वागत 'वंदे मातरम्' याच जोरदार घोषणेने केल. या सर्व मुलांना शाळेच्या पटावरून काढून टाकण्यात आले. तडजोड करून पुन्हा घेतलेही, पण हेगडेवारांनी आणि त्यांच्या एका मित्राने पुन्हा त्या शाळेत मातृभक्तीशी तडजोड करून प्रवेश करायला नकार दिला.

स्वातंत्र्ययज्ञकुंड धगधगत ठेवणारी बलिदानांची मालिकाच सुरू झाली. बंगालचा एक उन्मात न्यायाधीश किंग्जफोर्ड याच्यावर बॉम्ब टाकून त्याला मारण्याचा प्रयत्न कोवळया वयाच्या प्रफुल्ल चाकी आणि खुदीराम बोसने केला. प्रफुल्ल चाकी स्वतःवर गोळी झाडून शहीद झाला. खुदीराम पकडला गेला. हृदयाशी गीता धरून 'वंदे मातरम्' म्हणणारं ते तरुण पोर १९०८ मध्ये फासावर चढले. या भूमीला वंदन का करायचं, 'वंदे मातरम्' का म्हणायचे, याच उत्तर तिच्याच या वीरपुत्रांच्या पराक्रमात, तेजस्वितेत दडलेले आहे.

खुद्द लंडनमध्ये 'कॉन वायली' या एका भारतविरोधी इंग्रज अधिका-याचा मदनलाल धिंग्रा या तरुणाने भर समारंभात वध केला. सिंहाचा 'आ' वासून त्याचे दात मोजणारा 'भरत' जसा इथे जन्मला, तसा वाघाच्या गुहेत शिरून त्याचा वध करणारा मदनलालही त्याच भरतभूमीत जन्मलेला होता. पोलीसांच्या स्वाधीन झालेल्या मदनलालने आपले एक वक्तव्य जनतेसमोर सादर करण्याची इच्छा प्रकट केली. पण इंग्रजांनी ते दडपले, इतक ते जहाल होते. त्याचे ते आत्मवृत्त लंडनच्याच 'डेली न्यूज' या वर्तमानपत्रातून 'चॅलेंज' या नावाने प्रसिध्द झाले. आपल्या कुलुपात बंद असलेलं वक्तव्य जाहीर कसं झालं हा प्रश्न गुप्त पोलीसांनाही पडला. १७ ऑगस्ट १९०९ ला मदनलाल धिंग्रा हसत हसत फासावर चढले. सावरकरांच्या भाषेतून मदनलालचे तोड़ी अखेरचे वक्तव्य यावेळी प्रसवले गेले. यावेळी 'चॅलेंज' म्हणून सर्व जगभर त्याचा गौरव झाला. ते असे होते.

''आत्मबलिदान कसं करावं, ही एकच शिकवण सध्या हिंदुस्थानात देण्यायोग्य आहे. ही शिकवण देण्याचा एकच मार्ग म्हणजे स्वतः आत्मबलिदान

करणं. माझ्या हौतात्म्याचा मला अभिमान वाटत आहे. याच भारतभूचे संतान म्हणून मला पुनर्जन्म मिळो, आणि याच पवित्र कार्यात मला पुन्हा मृत्यु येवो, इतकीच ईश्वरचरणी माझी प्रार्थना आहे. मानवजातीचे कल्याण आणि ईश्वराचे वैभव यांचा पुरस्कार करणारा स्वतंत्र भारत जगात आत्मतेजाने तळपू लागेपर्यंत माझ्या जन्ममृत्यूचे हे चक्र असेच चालू रहावे. वंदे मातरम्!''

या घटनेनंतर लगेचच म्हणजे २१ डिसेंबर १९०९ ला मदनलालच्या बलिदानाने प्रेरीत होऊन एका महाराष्ट्रीय तरुणाने आपले पाऊल उचललं. बाबाराव सावरकर आणि अण्णा कर्व्यांच्या मार्गदर्शनाखाली काम करणाऱ्या क्रांतीकारी गटात नव्याने शिरलेल्या पण या भूमीशी जुन दृढ नातं स्मरणाऱ्या या तरुणाने जॅक्सनच्या वधाचा विडा उचलला. नाशिकमध्ये थैमान घालणाऱ्या त्याच्या अत्याचाराचा शेवट तिथल्याच विजयानंद थिएटरात त्याच्या छातीवर गोळी घालून त्याने केला. संगीत शारदेला पाहुणा म्हणून आलेला जॅक्सन खाली कोसळला. बालगंधर्वांना मिळणाऱ्या टाळ्यांचा आणि कौतुकाचा मानकरी त्यादिवशी तो तेजस्वी तरुण होता, त्याचं नांव होत अनंत लक्ष्मण कान्हेरे. अवघं १९ वर्षाच वय आणि आत्मबलिदानाची मनोवृत्ती. महाराष्ट्राच्या इतिहासातला एक गौरवी शिरपेच,

१९२७ मध्ये राजेंद्र लाहिरी, पंडीत रामप्रसाद बिस्मील, अशफाकउल्ला खाँ, रोशनसिंग यांना काकोरी कटातल्या सहभागासाठी गोरखपूर तुरूंगात फासावर चढवण्यात आले. कवी रामप्रसाद बिस्मीलांच आत्मवृत्त बंदी घालून दडपण्यात आले.

**काकोरीसारखा चितगांव कट :** बंगाली क्रांतीकारक सूर्यसेनदा आणि तेथील नवयुवक-युवतीनी इंग्रजांच्या फौजेशी जणू युध्दच केले. त्यात सूर्यसेन आणि तारकेश्वर यांना फाशीची शिक्षा सुनावली गेली. १२ फेब्रुवारी १९३४ च्या रात्री सूर्यसेनदांना कोठडीकडे नेत होते. फाशी दुसऱ्या दिवशी अंमलात येणार होती. सूर्यसेनदा हातातल्या बेड्या खळखळवत गरजले, 'वंदे मातरम्!' त्या रात्रीच्या

काळ्या शांततेवर तेजाचे तरंग उमटले. दुसऱ्याच क्षणी त्याच तरंगांनी ती कोठडी भारावली गेली, तेव्हा इतर राजबंदीही त्याला 'वंदे मातरम्'चेच प्रतिसाद देवू लागले. सूर्यसेनांना मारहाण करून बेशुध्दावस्थेतच फाशीच्या तख्तावर चढवल गेलं. इंग्रजांच्या निर्घृणतेचा आणि क्रांतीकारकांच्या स्वाभिमानाचा एकाच वेळी आलेला तो 'प्रत्यय' होता.

'वंदे मातरम्' हा स्वातंत्र्याचा महामंत्र होवून गेला. यज्ञ होता स्वातंत्र्याचा! आहुती होत्या प्रत्येक जन्म भारतमातेसाठी अर्पण करण्याऱ्या वीरांचे देह आणि पठण केला जाणारा मंत्र होता, वंदे मातरम्! वेदमंत्रापेक्षाही कितीतरी पूजनीय, प्रिय, वंदनीय असा मंत्र

*वंदे मातरम्, वंदे मातरम्.*
*वेदनमंत्रांहून आम्हा, वंद्य वंदे मातरम् ।।*
*माऊलीच्या मुक्ततेचा, यत्न झाला भारती*
*त्यात लाखो वीर, देतो जोवोतांच्या आहुती*
*आहुतीने सिध्द केला, मंत्र वंदे मातरम् ।।१।।*

पण जसं ज्वालामध्ये तावून सुलाखून निघाल्याशिवाय सोन्याचं सुवर्णपण आणि अग्निपरीक्षा दिल्याशिवाय जर सीतेचे सतीत्व सिद्ध होत नाही, तसे 'वंदे मातरम्'च झालं. 'वंदे मातरम्' विरोधांच्या मधून अजूनच चिरंतन झाले. वाराणसीच्या अधिवेशनात याला पहिला विरोध झाला. पण तो ब्रिटीशांच्या दडपशाहीला बळी पडून, तो काही मनापासूनचा प्रखर विरोध नव्हे! त्यात द्वेषभावना नव्हती.

१९२३ च्या 'काकीनाडी' येथे झालेल्या अधिवेशनामध्ये 'वंदे मातरम्' वर जातीय शिक्का बसला. भारतीय शास्त्रीय संगीतातले आदराचे स्थान, पंडीत विष्णू दिगंबर पलुस्कर त्या अधिवेशनात 'वंदे मातरम्'चे गायन करणार होते. तेजस्वी डोळांचे एखाद्या ऋषीसारखे भासणारे पंडीतजी गायला सुरुवात करणार, इतक्यात अध्यक्ष मौलाना महमद अली यांनी त्या 'वंदे मातरम्'ला विरोध केला. कारण काय, तर म्हणे ते हिंदू धर्माची थोरवी गाणारे गीत आहे. त्यावर विष्णू दिगंबरांनी

स्पष्ट शब्दात ठणकावले- हे राष्ट्रीय सभेचे व्यासपीठ आहे. धर्माचे प्रार्थनास्थळ नव्हे! आपला विरोध असेल तर आपण सभास्थळ सोडून जावू शकता.

'आपल्या कलेतच रममाण होवून देशाचं आणि भोवतालच्या जगाचे आपण काही देणं लागतो, हे साफ विसरून जाणाऱ्या कलावंतापैकी पंडीतजी नव्हते, ही निश्चितच गौरवास्पद गोष्ट आहे.

आणि 'वंदे मातरम्' हे मुस्लिमविरोधी असण्याचा प्रश्नच येत नाही. आनंदमठ कादंबरीतील कथानक हे मुस्लीम राज्यसत्ताधाऱ्यांच्या अमानवी कृत्यांविरोधीचे कथन करते, ते एका प्रवृत्तीचे कथानक आहे, त्यातून धर्मभावनेची जपणूक करणे म्हणने सर्व कादंबऱ्या ह्या इतिहासाच्या आवृत्त्या समजणे असेच नाही का ठरणार? शिवाय आनंदमठ कादंबरी १८८० साली लिहीताना त्यापूर्वी १८७५ मध्ये वन्दे मातरम् लिहीले गेले. त्यामुळे आनंदमठ कादंबरी व वन्दे मातरम् गीत यांचा संबंध लावणे सर्वतः कपोलकल्पीत होय.

पंडीतजीचे शिष्य पं. ओंकारनाथ ठाकूर यांनीही त्यांचाच वारसा गायनाबरोबर याही बाबतीत चालवून 'वंदे मातरम्'चा आग्रह धरला अधिवेशनाचे निमंत्रण आले, तर संपूर्ण वंदे मातरम् होणार असेल, तरच मी येईन असे त्यांनी सुनावले होते. १५ ऑगस्ट १९४७ ला त्यांच्या आणि हिराबाई बडोदेकरांच्याही आवाजात स्वातंत्र्याची पहाट स्वरमयी झाली. त्यांनी आणि विनायकबुवा पटवर्धनांनी हीच काफी रागातील चाल लोकप्रिय केली. 'वंदे मातरम्'चे केवळ गायन करणारे विष्णुपंत पागनीस, केशवराव भोळे, मोगुबाई कुर्डीकर, हेमंतकुमार, पंकज मलिक, तिमीर बरन, दिलीपकुमार रॉय, एम. एस. सुब्बलक्ष्मी, गीता रॉय आणि जी. एम. दुराणी, कमल दासगुप्ता, भवानीचरण दास, तपन सिन्हा, नारायण मुखर्जी असे दिग्गज आहेत. हे 'वंदे मातरम्' संगीतबध्द केलेच पण ते राष्ट्रगीत व्हावे म्हणून खूप परिश्रम घेणारी दोन नांव दिसतात. पहिले मास्टर कृष्णराव फुलंब्रीकर आणि दुसरे वि. दे. अंभईकर, भारतभर मानाचे स्थान असलेले, आपल्या मधुर गायकीने अनेक मैफिलींना बहराचे रंग आणणारे मास्टरजी 'वंदे मातरम्'वर बंदी असताना ते आकाशवाणीवरून प्रसारीत केले जावे यासाठी प्रयत्नरत होते. अशातच त्यांच्या

शास्त्रीय गायनाचा कार्यक्रम रेडिओवर चालू असताना त्यांनी 'वंदे मातरम्'च्या जवळच्या सुरातील स्वर लावून गायला सुरूवात केली आणि त्याला जोडून 'वंदे मातरम्' सुरू केले. रेडिओ डायरेक्टर झेड, ए. बुखारी यांनी लगेचच ते बंद पाडले, मास्टर कृष्णरावांनी निश्चय केला की, 'वंदे मातरम्' ला परवानगी मिळेपर्यंत रेडिओवर गाणार नाही. दहा वर्षानंतर सरदार पटेलांच्या आग्रहावरून रेडिओवरून आमंत्रण आले, तेव्हा देखील त्यांचा निश्चय ठाम होता. स्वातंत्र्याच्या प्रारंभी त्यांनी 'वंदे मातरम्' संपूर्ण गाऊनच तो अंमलात आणला. गायकीच्या उन्नतिच्या काळात लोकप्रियतेच्या शिखरावर असताना 'वंदे मातरम्' साठीचा हा मास्तरांचा त्याग डोळे दिपवणारा होता.

वि. द. अंभईकरांनीसुध्दा आयुष्यभर वंदे मातरमसाठी सांगितिक परिश्राम घेतले. अनेक जणांच्या भेटीगाठी घेवून आपले 'वंदे मातरम्' विषयीचे अनेक प्रयोग ऐकवले. ते 'वंदे मातरम्' च्या सांगितिक रचनेचे पहिले रचनाकार मानले जातात. 'आनंदमठ' या चित्रपटातली ओजरसपूर्ण, स्फूर्तीदायी 'वंदे मातरम'ची चाल त्यांनीच बांधली, जी आज खूप लोकप्रिय आहे.

त्यांनी या गीताच्या समूहगानाची प्रात्यक्षिके वरिष्ठ नेत्यांपर्यंत पोहोचवली. क्षुल्लक कारणावरून त्याला डावलणाऱ्या काही स्वार्थी नेत्यांचे समाधानही 'वंदे मातरम्' बँडवर बसवून घेवून त्यांनी केले. तरीही 'जनगणमन' चा आग्रह, हट्टच धरला गेला. 'वंदे मातरम्' ची पार्श्वभूमी पाहता से राष्ट्रगीत होण्यास काहीच हरकत नव्हती. तरीही भारतीय हृदयांचा हुंकार दुय्यम स्थानावर ठेवला गेला. 'वंदे मातरम्' आणि 'जनगणमन' या दोन्हीतली मातृवंदना श्रेष्ठ बंगाली कवीनीच केलेली आहे, जनगणमन संचलनाच्या तालात बसतं, तसच वंदे मातरम्ही! आझाद हिंद सेनेनेही सुभाषबाबूंच्या वंदे मातरम् प्रेमामुळे सिंगापूर रेडिओवरून ते आग्रहाने प्रसारित करून ते रूढ केले.

जनगणमन हे एक स्तोत्र आहे. निद्रीस्त आणि परतंत्र भारताबद्दलची व्याकुळता त्यामध्ये आहे. सर्व दिशांकडील धर्म आणि समाज एकत्र येवून भारत

भाग्यविधात्याच्या सिंहासनापाशी प्रेमहार गुंफतील आणि तो या देशाचे दुःखहरण करेल. या गीताच्या शेवटी निद्रीस्त भारत जागा होतोय. रात्र संपते, पहाट होते, पूर्व उदयगिरीचे भाल रवितेजाने उजळत आहेत, अशी एक आश्वासक परिस्थिती निर्माण होते, असे ते वर्णन आहे.

'वंदे मातरम्' ही एक रूपकात्मक रचना आहे, जिच्या धृवपदातून 'माते, मी तुला वंदन करतो' हा शरणभाव आहे. भक्तीभाव आहे. जसजसे तिच्यामधल्या दुर्गारुपाला पहावे, तसतसा वीररसही आहे. या मातृभूमीच्या चरणी लीन होण्याचा भक्तीभाव आहे, तसा तिचे रक्षण करण्यास आम्ही सिध्द, सामर्थ्यवान आहोत, असा ठामपणाही, आवेशही त्यात आहे. हे सारे तर आहेच, पण या स्वातंत्र्याची फळे आपल्याला चाखायला देताना प्रणार्पण केलेल्या ज्या क्रांतीकारक आणि सत्याग्रहीच्या मुखातून हा मंत्र बाहेर पडला, त्यांनी सोसलेल्या यातनामय देहदंडाचे आणि त्यागाचे असीम तेजोवलय या गीतामागे आहे. बंकीमचंद्राच्या आणि वंदे मातरम्च्या जन्मस्थळी जाल, तर तिथे या आपल्या स्फूर्तीमंत्राचे राष्ट्रीय स्मारक दिसेल, तिथे कर जुळवून क्षणभर त्याचे मनात स्मरण कराल, तर ते वंदन भारताच्या स्वातंत्र्ययज्ञातील प्रत्येक ज्ञात-अज्ञात आहुतीला स्पर्शून येईल, त्यांची आत्मस्पंदने 'वंदे मातरम्'च्या स्वरात स्वर मिळवून ऐकू येतील.

**त्रैमासिक कर्नाळामधून प्रकाशित लेख साभार**

**लेखिका : अरुंधती कुलदीप धुमाळे**

**आय.टी.आय.चे मागे, टाकीजवळ, बीड, जि. बीड, ४३११२२.**

**त्रैमासिक कर्नाळा क्रांतिपुष्प अकरावे मधील प्रकाशित लेख साभार.**

**नव्वद वर्षे अखंड झालेल्या**

# भारतीय स्वातंत्र्य समरातील क्रांतिघटनांची सूची

**विद्यार्थी मित्रांनो... भारतीय स्वातंत्र्य संग्रामातील ठळक घटना कशा घडत गेल्या याचे सहज दर्शन व्हावे या उद्देशाने ही सूची सादर करीत आहोत.**

१) दि. २९ मार्च १८५७ हुतात्मा मंगल पांडे यांनी बराकपूरच्या छावणीत प्रथम पारतंत्र्याविरुध्द गोळी झाडली.

२) दि. ८ एप्रिल १८५७ हुतात्मा मंगल पांडे यांना फाशी.

३) दि. १० मे. १८५७ मिरतच्या सैनिकांनी ‘मारो फिरंगी को’ ही घोषणा करीत पारतंत्र्याविरुध्द पहिली तोफ डागली.

४) दि. ११ मे दिल्ली स्वतंत्र झाली.

५) दि. ३१ मे रोहिलखंड स्वतंत्र झाले.

६) दि. ४ जून बनारस, अलाहाबाद, कानपूर झांशी स्वतंत्र झाली.

७) दि. ३० मे अयोध्या स्वतंत्र झाली.

८) दि. २७ जून १८५७ कानपूरच्या गंगाप्रवाहात एक सहस्व ब्रिटीशांना कंठस्नान,

९) दि. २६ एप्रिल १८५७ जगदीशपूरचे कुमारसिंह आपला प्रदेश स्वतंत्र करुन आपल्या राजप्रासादांत परमेश्वरी तत्वांत विलीन झाले.

१०) दि. १४ सप्टेंबर १८५७ दिल्लीचे पतन.

११) दि. १८ जून १८५८ झांशीची महाराणी संग्राम देवता लक्ष्मीबाई ग्वाल्हेरला धारातीर्थी.

१२) दि. १८ एप्रिल १८५९ सेनापती तात्या टोपे यांना शिप्री येथे फाशी.

१३) दि. ८ ऑक्टोबर १८५९ ला श्रीमंत नानासाहेब पेशवे यांचा नेपाळमध्ये

मृत्यु झाला असे म्हणतात. दि. ३१ डिसेंबर १८५८ ला ते नेपाळात अंतर्धान पावले.

१४) दि. १२ जून १८५८ बाबासाहेब नरगुंदकर भावे यांना बेळगावला फाशी दिले.

१५) इ. स. १८५८ च्या उत्तरार्धात कित्तूरची महाराणी चन्नमा हिचे निधन.

१६) दि. २० ऑगस्ट १८६२ रावसाहेब पेशवे यांना कानपूरच्या तुरूंगात फाशी...

१७) इ. स. १८७९ चा प्रारंभ वासुदेव बळवंत फडके यांचे उत्थान.

१८) दि. २० जुलै १८५९ श्री. फडके यांना अटक.

१९) फेब्रुवारी १८८१, फडके यांना एडनच्या तुरूंगात मृत्यु.

२०) इ. स. १८७२ पं. रामसिंह कुका यांच्या नेतृत्वाखाली पंजाबचे उत्थान.

२१) इ. स. १८८५ मध्ये पं. रामसिंह कुका यांचे ब्रम्हदेशातील तुरूंगात बलिदान.

२२) दि. २२ जून १८९७ रेंड व आयर्स्ट यांचा चाफेकर बंधूनी पुणे येथे वध केला....

२३) दि. १८ एप्रिल १८९८ दामोदरपंत चाफेकर फाशी गेले.

२४) दि. ८ फेब्रुवारी १८९९ द्रविड बंधूंचा पुणे येथे वध.

२५) दि. ८ मे १८९९, १० मे १८९९ व १२ मे १८९९ ला अनुक्रमे वासुदेवराव चाफेकर, श्री. म. वि. रानडे व बाळकृष्णपंत चाफेकर फाशी गेले.

२६) दि. १ जानेवारी १९०० नाशिकला सावरकरांनी मित्रमेळयाची स्थापना केली.

२७) इ. स. २० जुलै १९०५ वंगभंगाची घोषणा व पुण्यातील विलायती कापडाची होळी.

२८) इ. स. १९०६ बारिंद्रकुमार घोषांनी बंगालमध्ये युगांतर समितीची स्थापना केली.

२९) दि. ९ जून १९०६ ला श्री. विनायक दामोदर सावरकर यांनी लंडनला

जाण्यासाठी भारत सोडले

३०) दि. ९ मे १९०७ लाला लजपतराय व सरदार अजितसिंह यांना सीमापार केले.

३१) इ. स. १९०७ सेनापती बापट यांनी बॉम्बविद्या मिळविली.

३२) दि. १८ ऑगस्ट १९०७ ला मॅडम कामा यांनी पहिला भारतीय राष्ट्रध्वज जर्मनीतील स्टुटगार्ट शहरी आंतरराष्ट्रीय सोशलिस्ट कांग्रेसमध्ये फडकाविला.

३३) इ. स. १९०८ च्या डिसेंबर मध्ये हरदयाळ भारतात आले.

३४) मार्च १९०८ मध्ये सेनापती बापटांचे भारतात पदार्पण.

३५) दि. ११ एप्रिल १९०८ खुदीराम बोसने मुझफ्फरपूरला बॉम्ब प्रक्षेप केला. हाच भारतातील बॉम्बचा पहिला प्रकट प्रस्फोट.

३६) दि. १० मे १९०८ रोजी लंडन येथील इंडिया हाउसमध्ये १८५७ च्या स्मृतिदिनाचा प्रकट समारंभ झाला.

३७) दि. ६ जुलै १९०८ शिवरामपंत परांजपे यांना १९ महिन्यांची शिक्षा.

३८) दि. २३ जुलै १९०८ लो. टिळकांना ६ वर्षांची शिक्षा.

३९) दि. ११ ऑगस्ट १९०८ खुदीराम बोसला फाशी.

४०) दि. ३१ ऑगस्ट १९०८ नरेंद्र गोस्वामीचा अलीपूरच्या तुरूंगात कन्हैय्यालाल दत्त व सत्येंद्र बसू यांनी वध केला.

४१) दि. २० नोव्हेंबर १९०८ व दि. २१ का अनुक्रमे कन्हैय्यालाल दल व सत्येंद्र बसू यांना अलीपूरच्या तुरुंगात फाशी.

४२) दि. १२ फेब्रुवारी माणिकताला अभियोगात बारींद्र घोष, उल्लासकर दत्त व उपेंद्र यांना जन्मठेप व श्री. अरविंद घोष यांची मुक्तता...

४३) इ. स. १९०६ पुलिन बिहारीदास यांनी अनुशीलन समिती स्थापन केली.

४४) खुदीराम बोसला पकडून देणारा इन्स्पेक्टर नन्दलाल बॅनर्जी याचा दि. ९-११-१९०८ ला वध.

४५) दि. ११ ऑक्टोबर १९०९ ला डाक्याजवळ राजेन्द्रपूर येथे गाडीवर

आक्रमण करून २३ सहस्त्र रुपयांचा सरकारी खजिना लुटला.

४६) दि. १९ डिसेंबर १९११ बंगालची फाळणी रद्द झाल्याची घोषणा.

४७) इ.स. १९९९ अरविंदांची राजकारण निवृत्ती.

४८) दि. ८ जून १९०९ श्री. गणेश दामोदर सावरकर यांना जन्मठेपेची शिक्षा झाली.

४९) दि. १ जुलै १९०९ मदनलाल धिंग्रा यांनी कर्झन वायलीला लंडन येथील जहांगीर हॉलमध्ये ठार मारले.

५०) दि. १६ ऑगस्ट १९०९ मदनलाल धिंग्रा फाशी गेले.

५१) दि. २९ डिसेंबर १९०९ नाशिकच्या विजयानंद थिएटरमध्ये अनंतराव कान्हेरे यांनी कलेक्टर जॅक्सनला ठार मारले.

५२) दि. १९ एप्रि १९१० जॅक्सन वध अभियोगात कृष्णाजीपंत कर्वे, विनायकराव देशपांडे व कान्हेरे ठाण्याच्या तुरूंगात फाशी गेले.

५३) इ. स. १९११ च्या प्रारंभी सावरकरांना अटक व त्यांची त्रिखंडात गाजलेली उडी.

५४) २२ मार्च १९११ ला स्वा. सावरकरांना दोन जन्मठेपेची शिक्षा.

५५) १२ मार्च १९०८ ला चिदंबर पिल्ले यांच्या नेतृत्वाखाली मद्रास प्रांतातील तिनीवल्ली येथे सरकार विरुध्द बंड.

५६) दि. १७ जून १९११ ला वांची अय्यर ह्यांनी मि. आइश याला ठार मारले. तो तिनीवल्लीचा डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट होता.

५७) इ. स. १९०७ मध्ये डॉ. खानखोजे व प. काशीराम यांनी अमेरिकेत भारतीय स्वातंत्र्यसंघाची स्थापना केली.

५८) दि. २३ डिसेंबर १९१२ दिल्ली येथे लॉर्ड हार्डिंग याच्या मिरवणूकीवर बॉम्बचा प्रक्षेप.

५९) दि. ५ ऑक्टोबर १९१४ हार्डिज बॉम्ब केस मध्ये मा अमीरचंद, अवधबिहारी, भाई बालमुकुंद व वसंतकुमार विश्वास यांना फाशीची शिक्षा.

६०) दि. १० मे १९१३ लाला हरदयाळ यांनी अमेरिकेतील स्वातंत्र्यसंघाचे

गदर पक्षात रुपांतर केले.

६१) दि. १ नोव्हेंबर १९१३ सुंदर वर्तमानपत्राचा पहिला अंक बाहेर पडला.

६२) दि. २४ मार्च १९१४ अमेरिकन सरकारने हरदयाळ याना अटक करून नंतर सोडून दिले.

६३) दि. २३ मे १९१४ कोमागाटामारू कॅनडाला पोहचले.

६४) दि. २९ सप्टेंबर १९९४ बजबज येथे परत आलेल्या कोमागाटामारूवर ब्रिटीशांचे आक्रमण याच सुमारास कॅनडाचे इमिग्रेशन अधिकारी मि. हॉबकोन्स यांना कॅनडात भाई मेवासिंह यांनी ठार मारले.

६५) इ. स. १९१४ च्या उत्तरार्धात विष्णू गणेश पिंगळे, कर्तारसिंग, प काशीराम प्रभृतींचे भारतात आगमन व पं काशीराम यांना फाशी

६६) द्वितीय भारतीय स्वातंत्र्याचे विशाल आयोजन दि. १९ फेब्रुवारी १९१५ ला फसले.

६७) इ. स. १९१५ च्या मध्यात रासबिहारींचा भारतत्याग.

६८) लाहोर षड्यंत्राचा प्रथम अभियोग व दि. १५ नोव्हेंबर १९१६ कर्तारसिंह, पिंगळे, जगतसिंह, हरनामसिंह प्रभृती सात जणांना फाशी व भाई परमानंद, पं. परमानंद प्रभृतींना जन्मठेप.

६९) इ. स. १९१५ च्या शेवटी बनारस षड्यंत्राच्या अभियोगात शचिंद्र संन्याल यांना जन्मठेप.

७०) लाहोर षड्याच्या दुसऱ्या अभियोग सिंह, डॉ.सिंह, रंगासिंह व वीरसिंह यांना फाशी व ४२ लोकांना जन्मठेप.

७१) लाहोरच्या तिसऱ्या अभियोग मसिंह, डॉ. अरुडासिंह केहरसिंह व जीवनसिंह यांना फाशी.

७२) इ. स. १९१५ मध्ये इराणच्या रणक्षेत्रावर इंग्रजांशी लढता लढता सूफी अम्बाप्रसाद यांचे देहावसान व डॉ. खानखोजे यांचे बलुचिस्थानमध्ये ये जनरल डामरशी युध्द

७३) दि. ९ सप्टेंबर– १९१५ ला बंगालचे क्रांतिनेते यतीन्द्रनाथ मुकर्जी याचा बालासोरच्या अरण्यात ब्रिटीशांशी लढता लढता प्राणत्याग.

७४) दि. २१ फेब्रुवारी १९१५ ला क्रांतिकारकांनी सिंगापूर स्वतंत्र करून तेथे स्वातंत्र्यध्वज फडकाविला.

७५) इ. स. १९१५ मध्ये ब्रम्हदेशात दंड झाले व ते अयशस्वी ठरून त्याचे नेते पं. सोहनलाल पाठक व हरनामसिंग फाशी गेले.

७६) दि. १५ जून १९१८ तारिणी मुजुमदार व नलिनी वाक्ची यांनी डाका येथे इंग्लिशांशी हातबाईने युष्ट करून प्राणत्याग केला.

७७) प्रथम महायुध्दात जर्मनीचा पराभव झाला व हरदयाल, वीरेंद्र चट्टोपाध्याय, डॉ. खानखोजे महेंद्रप्रताप, मानवेन्द्रनाथ रॉय, रासबिहारी, हेरंबलाल गुप्त प्रभृतींचे द्वितीय स्वातंत्र्ययुध्दाचे सर्व प्रयत्न धुळीस मिळाले.

७८) इ. स. १९१९ रौलेट ॲक्ट व त्याच्या विरोधी भयानक दमनांत जालियनवाला बाग हत्याकांड.

७९) दि. २१ डिसेंबर १९२० मैनपुरी षड्यंत्राचे जनक व मातृवेदी संस्थेचे नेते पं. गेंदालाल दीक्षित यांचा दिल्लीच्या हॉस्पिटलमध्ये मृत्यु.

८०) दि. १२ जानेवारी १९२४ गोपीमोहन साहा यांनी मि. डे याचा वध केला व फाशी गेले.

८१) इ. स. १९२४ मिरत कटाचा खटला.

८२) इ. स. १९२३ बब्बर अकाली दलाचे आंदोलन. दि. १ सप्टेंबर १९२३ बोमेली युध्दात कर्मसिंह, उदयसिंह बिशनसिंह व महेंद्रसिंह यांचा रणस्थळी प्राणत्याग, दि. २५ ऑक्टोबर १९२३ धन्नासिंहाचे बलिदान दि. १२ डिसेंबर १९२३ यन्तासिंह धामिया यांचे मुंडेर येथे लढता लढता बलिदान  दि. ८ जून १९२४ वर्यामसिंह यांचा लायलपूर येथे पोलिसांशी लढता लढता प्राणत्याग, धर्मसिंह, किशनसिंह, संतासिंह, नंदसिंह, दिलीपसिंह, व कर्मसिंह यांना बब्बर अकाली दलाच्या अभियोगांत दि. २७ फेब्रुवारी १९२३ ला लाहोर सेंट्रल जेलमध्ये फाशीची शिक्षा..

८३) इ. स. १९२४ मध्ये श्रीराम राजू यांचे मद्रास प्रांतात बंड.

८४) इ. स. १९२५ मधील दक्षिणेश्वर बॉब केसचे अभियुक्त अनंत हरि मित्र व प्रमोद चौधरी यांना दि. २८ मे १९२८ ला फाशी.

८५) इ. स. १९२४ मध्ये योगेशचंद्र चटर्जी व शबद्र सन्याल यांच्या नेतृत्वाखाली हिंदुस्थान रिपब्लिकन असोसिएशनची स्थापना.

८६) दि. ९ ऑगस्ट १९२५ रामप्रसाद बिस्मिल यांच्या नेतृत्वाखाली लखनौ जिल्ह्यातील काकोरी स्टेशनवर आगगाडीवर आक्रमण करून सरकारी खजिन्याची लूट

८७) दि. ६ एप्रिल १९२७ काकोरी कटाच्या खटल्याचा निर्णय.

८८) दि. १९ डिसेंबर १९२७ पं. रामप्रसाद बिस्मिल यांना गोरखपूरच्या तुरूंगात फाशी. दि. १७ डिसेंबर १९२७ राजेद्रनाथ लाहिरी यांन येथे फाशी व अश्फाक उल्ला खाँ यांना त्याच दिवशी फैजाबादच्या तुरुंगात फाशी शचीन्द्र सन्याल व योगेश चटजी यांना जन्मठेप काळेपाणी.

८९) दि. ८ सप्टेंबर १९२८ चंद्रशेखर आझाद यांच्या सेनापतीत्वाखाली हिदुस्थान सोशलिस्टीक रिपब्लिकन आर्मीची स्थापना...

९०) दि. २० ऑक्टोबर १९२२ लाला लजपतराय यांच्या नेतत्वाखाली लाहोर येथे सायमन कमिशन विरोधी निदर्शन व स्कॉट याच्या आज्ञेवरून डेप्युटी सुपरीटेंडेंट ऑफ पोलीस मि. सेंडर्स यांच्या हस्ते लालाजीच्या छातीवर दंडुक्याचे प्रहार.

९१) दि. १७ नोव्हेंबर १९२८ लाला लजपतराय यांचा मृत्यु.

९२) दि. १७ डिसेंबर १९२८ लाहोर येथे पोलीस चौकी समोर सेंडर्सचा वध,

९३) दि. ८ एप्रिल १९२९ दिल्लीच्या मध्यवर्ती असेंब्लीच्या सभागृहात सरदार भगतसिंग व बटुकेश्वर दत्त यांच्या हस्ते बॉम्बप्रक्षेप.

९४) दि. १० जुलै १९२९ लाहोर षड्यंत्राचा पहिला खटला.

९५) दि. १३ सप्टेंबर १९२९ यतीन्द्रनाथ दास यांचे प्रायोपवेशनपूर्वक आत्मसमर्पण

९६) दि. ७ ऑक्टोबर १९३० लाहोर षड्यंत्राच्या खटल्याचा निर्णय. भगतसिंह, सुखदेव व राजगुरु यांना फाशी व किशोरीलाल महावीरसिंह,

विजयकुमार सिंह, शिववर्मा, डॉ. गयाप्रसाद, जयदेव व कमलनाथ त्रिवेदी यांना जन्मठेप काळेपाणी.

९७) दि. २३ मार्च १९३१ भगतसिंह, सुखदेव व राजगुरु यांना लाहोरच्या तुरूंगात फाशी.

९८) दि. २३ डिसेंबर १९२९ यशपाल यांनी दिल्लीजवळ विद्युत्यित्राच्या सहाय्याने व्हाईसरॉय लॉर्ड आयर्विन यांची गाडी बॉम्बने उडवली.

९९) दि. २८ मे १९३० बॉम्बच्या प्रयोगात भगवतीचरण बोहरा यांचे अपघाती निधन.

१००) दि. ३ मे १९३१ लाहोरच्या शालीमार बागेत पोलीसांशी लढताना जगदीशचंद्र रॉय यांचे धारातीर्थो शयन.

१०१) दि. २ डिसेंबर १९३० कानपूरच्या डी. ए. व्ही. कॉलेजच्या आवारात पोलीसांशी झालेल्या संघर्षात कित्येकांना कंठस्नान घालून सालग्राम शुक्ल यांचे धारातीर्थी शयन.

१०२) दि. २३ डिसेंबर १९३० हरिकृष्ण नावाच्या क्रांतिकारकाने पंजाब यूनिवर्सिटीच्या पदवीदान समारंभात गव्हर्नरवर व दि. ९ जून १९३१ ला तो फाशी गेला.

१०३) दि. १८ एप्रिल १९३० ला ५१ क्रांतिकारकांनी सूर्यसेन यांच्या नेतृत्वाखाली बंगालमधील चितगावच्या शस्त्रागारावर यशस्वी आक्रमण केले.

१०४) दि. २७ फेब्रुवारी १९३१ अलाहाबादच्या अल्फ्रेड पार्कमध्ये इंग्रजी सेनेशी लढत सेनापती चंद्रशेखर आझाद यांचे वीरमरण.

१०५) दि. २३ जानेवारी १९३२ सेनापती यशपाल यांना अटक.

१०६) दि. २२ जुलै १९३१ वासुदेव बळवंत गोगटे यांनी पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजमध्ये सोलापूरच्या मार्शल लॉंचा सूड माणून मुंबईचे गव्हर्नर हॉटसन यांच्यावर गोळी झाडली.

१०७) दि. ६ फेब्रुवारी १९३२ कलकत्ता विश्वविद्यालयाच्या पदवीदान समारंभात कुमारी वीणा दास या बी. ए. त असलेल्या विद्यार्थी

बंगालच्या गव्हर्नरवर गोळी झाडली.

१०८) दि. २४ सप्टेंबर १९३२ मध्ये कुमारी प्रीतीबहादुर बी. ए. यांनी चिकागांगच्या युरोपियन क्लबावर सशस्त्र आक्रमण करून आत्मसमर्पण केले.

१०९) इ. स. १९३१ मध्ये सायासान यांच्या नेतृत्वाखाली ब्रम्हदेशात बंड, दोनसहस्त्र लोकांचे रणक्षेत्रात बलिदान व बंडाच्या चौदा नेत्यांना फाशी.

११०) दि. २६ मे १९३२ ला चितगाव शस्त्रागारावरील आक्रमणाचे नेते सूर्यसेन, तारकेश्वर दस्तीदार व कल्पना दत्त यांना अटक. सूर्यसेन व दस्तीदार यांना फाशी व कल्पना दलांना जन्मठेप काळेपाणी.

१११) दि. १ सप्टेंबर १९३९ ला जर्मनीने पोलंडवर आक्रमण करून द्वितीय महायुध्दाच्या रणभेरी वाजविल्या. दि. ४ सप्टेंबर १९३९ ला ब्रिटन, फ्रान्स व भारत सरकार यांची जर्मनीविरुद्ध युध्द घोषणा.

११२) इ. स. १९४० च्या मार्च महिन्यात सरदार उधमसिंग यांनी लंडनमध्ये भर सभेत सर मायकेल ओडवायर याला ठार करून भारत मंत्री लॉर्ड झेटलड याला जखमी केले. दि. ३० जुलैला उधमसिंगांना फाशी दिले.

११३) दि. १२ जून १९४० सुभाषचंद्र बोस व सावरकर यांची मुंबई येथे सावरकर सदनात गुप्त भेट.

११४) दि. १६ जानेवारी १९४१ सुभाषचंद्र बोस यांचा गुप्तपणे भारतत्याग..

११५) दि. ८ ऑगस्ट १९४२ ला गांधीजींची 'भारत छोडो' घोषणा व अटक.

११६) इ. स. १९४२ ची स्वयंस्फूर्त जनक्रांती व तिच्या दमनांत पंधरा हजार लोक ठार...

११७) मार्च १९४१ सुभाषचंद्र बर्लिनला पोहोचले.

११८) दि. २८ मार्च १९४२ टोकियो येथे रासबिहारी बसूच्या नेतृत्वाखाली भारतीय स्वातंत्र्यसंघाची स्थापना

११९) दि. २० जून १९४३ सुभाषचंद्र टोकियोला येतात.

१२०) ऑक्टोबर १९४३ मध्ये सुभाषचंद्रांच्या नेतृत्वाखाली अस्थायी भारत सरकारची स्थापना व स्वतंत्र नऊ राष्ट्राची त्याला मान्यता.

१२१) दि. ४ फेब्रुवारी १९४४ आझाद हिंद सरकारची ब्रिटीश साम्राज्यशाही विरुध्द युध्द घोषणा

१२२) दि. १८ मार्च १९४४ इंग्लिश पराभूत के सहानवाझच्या आझाद हिंदसैन्याचा भारतात पदन्यास व मणिपूरला स्वातंत्र्यध्वज फडकाविणे.

१२३) दि. ७ मे १९४५ जर्मनीचे आत्मसमर्पण (१२४.) दि. १३ ऑगस्ट

१२४) १९४५ ला जपानवर अणूबॉम्ब

१२५) दि. १८ ऑगस्ट १९४५ सुभाषचंद्रांचा अपघात.

१२६) दि. २० जानेवारी १९४६ ते २१ एप्रिल संपूर्ण भारतात सैनिक विद्रोह.

१२७) दि. १५ ऑगस्ट १९४७ इंडिया इंडिपेन्डन्स ॲक्ट होऊन देशविभाजन व भारताला स्वातंत्र्य मिळाले.

**त्रैमासिक कर्नाळा क्रांतिपुष्प अकरावे मधील प्रकाशित लेख साभार.**